(२०३) 20150422170451912 7

रंकानाला लघु पाटबंधारे योजना ता.जि. नंदूरबार या योजनेस द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. लपायो २००६/४८५/(१५५/०६)/खारभूमी
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८/१२/२००६

पहावे : १) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे पत्र क्र. कासं/तापाविम/प्रशा-१/७६१/२००६, दि.१४.४.०६

२) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचे पत्र क्र. मुअ /तां-३/३२२१/२००६, दि.२८.९.०६

प्रस्तावना :

रंकानाला लघु पाटबंधारे योजना ता.जि.नंदूरबार या योजनेस शासन निर्णय क्रमांक लपात १०८८/(६४८/८८) लपा-१ दि.४.५.१९८९ अन्वये रु.२८७.०४ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तसेच बुडीत क्षेत्रातील विरोधामुळे सदर प्रकल्पाचे काम वेळेवर सुरू होऊ शकले नाही. दरम्यानच्या कालात दरसूचीतील वाढ, सिमेंट व स्टीलच्या भावात झालेली वाढ आवश्यक असलेले तांत्रिक बदल यामुळे योजनेचे सुधारित अंदाजपत्रक सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात येऊन त्यास महामंडळाचा निर्णय दि.६.४.१९९९ अन्वये रु.१२२३.५३ लक्ष एवढ्या किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्याचप्रमाणे दरसूचीच्या दरातील वाढ, गौण खनिजावरील स्वामित्व शुल्क, भूसंपादन, संकल्पचित्र बदल या कारणामुळे योजनेच्या किंमतीत वाढ अपेक्षित असल्याने सन २००३-०४ च्या दरावर आधारीत रु.२०,२२,७६,११५/-. किंमतीच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांच्या कडून प्राप्त झाला होता. व तो शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावासंबंधात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

आता या शासन निर्णयान्वये रंकानाला लघु पाटबंधारे योजना ता.जि.नंदूरबार या योजनेस सन २००३-०४ वर्षाच्या दरसूचीवर आधारित सुधारित केलेल्या प्राक्कलनानुसार कामाच्या एकूण अंदाजित रु.२०,२२,७६,११५/- (रुपये वीस कोटी, बावीस लक्ष, शहात्तर हजार एकशे पंधरा फक्त) यापैकी (रु.१६,७०,६४,५६१/- कामाप्रित्यर्थ, रुपये ३,५२,११,५५४/- आनुषंगिक खर्च) रकमेस योजनेचे काम प्रस्तावित किंमतीत पूर्ण होईल या अटीच्या अधीन राहून द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अंदाजपत्रकाचा गोषवारा सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये देण्यात आलेला आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र. आय-५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२ लहान पाटबंधा-यावरील भांडवली [illegible] इतर खर्च (३) बांधकामे लघु पाटबंधारे योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व चालू आर्थिक वर्षात तापी पाटबंधारे विकास महामंडळाकडे उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून परस्पर भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३८६/१४६१, दि.१.६.०६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६५४/०६व्यय-१२ दि.३१.१०.०६ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेली द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता (२७/२००६) अनुक्रमांकावर नोंदण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. च. हुमणे)
शासनाचे अवर सचिव

प्रतिलिपी.

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
अंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधीक्षक अभियंता, नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ, धुळे
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, धुळे
अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
लपा १ (२ प्रती) जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई
जिल्हाधिकारी, नंदूरबार
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. (२ प्रती)
संगणक कक्ष, मंत्रालय, मुंबई-३२.
कारभूमी संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक [illegible] (२४५/०६) व्दारमुळी दि. १८/१२/२००६ चे परिशिष्ट

[illegible] लघु पाटबधारे योजना ता.जि.नंदूरबार

अंदाजपत्रकाचा गोषवारा (परिनिरीक्षण टिप्पणीतील पृ. १९ ब)

क्र.	शिर्ष/उपशिर्ष	रक्कम (रुपये लक्ष)		एकूण रुपयात
		शिर्षकामे	मुख्य व शाखा कालवे	
१.	'ए' प्राथमिक	२५००००	२६१९८४	५११९८४
२.	'बी' (भूसंपादने)	२५०७२८६२	२५४००००	२७६१२८६२
३.	'सी' मुख्य कामे	११७५१७७९३५	-----	११७५१७७९३१
४.	डी विमोचक	२२३१७८४	६३५३५६	२८६७१४०
५.	ई फॉल	----	१९९३९९	१९९३९९
६.	एफ आरएचटी वर्क्स	------	१५८३२६३	१५८३२६३
७.	जी पूल(सीटी क्रॉसिंग	----	१४३२५८८	१४३२५८८
८.	एच एस्केप	----	१३००१५	१३००१५
९.	'के' इमारती	२०००००	१४३००	२१४३००
१०.	एल नालीकाम	------	८२७०६३	८२७०६३
११.	एम वृक्षारोपन	-----	---	---
[illegible]	'ओ' संकिर्ण	३५००००	६८३२८	४१८३२८
१३.	'पी' देखभाल	२०००००	९२५२	२०९२५२
१४.	'आर' दळणवळण	५०००००	५००००	५५००००
१५	वितरिका	---	११०६४७५०	११०६४७५०
१६	स्वामित्व शुल्क	२०८०३०४	१८५३८२	२२६५६८६
	कामाप्रित्यर्थ किंमत	१४८०६२८८१	११९००१६८०	१६६७०६४५६१
	आनुषंगिक खर्च (२५.२५% भूसंपादन वगळून)			३५२११५५४
	योजनेची एकूण किंमत	**१४८०६२८८१**	**११९००१६८०**	**२०२२७६११५**

तळक वैशिष्टे

योजनेची सिंचन क्षमता	६०२ हेक्टर
नियोजित पाणीसाठा	६७७९.८० स.घ.मी
पाणीसाठ्याची प्र.स.घ.मी.किंमत (रु.)	२९८३५ > २९६७० (आर्थिक मापदंडात बसत नाही)
लाभव्यय गुणोत्तर	१.२७ > १.०० (आर्थिक मापदंडात बसते)